“वसंतराव चव्हाण यांचे जीवन व कार्य एक चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखेतंर्गत इतिहास या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

साईनाथ मनोहर गायकवाड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. संगीता संदीप शिंदे

प्रोफेसर, इतिहास विभाग

यशवंत महाविद्यालय, नांदेड

ता.नांदेड जि.नांदेड

संशोधन केंद्र

यशवंत महाविद्यालय, नांदेड

डिसेंबर : २०२२

प्रस्तावना

मराठवाडा ही संत, समाजसुधारक व शूरवीरांची भूमी आहे. अशा या भूमीत मनुस्मृती काळात अज्ञान, अंधश्रद्धा, जातीयता, गरीबी या समस्यांनी समाज ग्रस्त झालेला होता. तसेच स्वतंत्रपूर्व काळात ब्रिटिशांकडून झालेले आर्थिक शोषण तर दुसऱ्या बाजूला निजामांच्या जूलमी व अन्यायी राजवटीमुळे सामान्य जनतेला अतोनात छळाला सामोरे जावे लागले. अशा अवस्थेत समाज परिवर्तन कण्याचे महत्त्वाचे कार्य होते. त्यासाठी अनेकांनी आपापल्या परीने विविध क्षेत्रात कार्य केले. त्यातील शिक्षण, सहकार समाजव्यवस्थेतील जाती निर्मूलन या व यासारख्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम करणारी जी मोजकी मंडळी मराठवाड्यात होऊन गेली. त्यातीलच एक व्यक्तिमत्व म्हणजे माजी आमदार वसंतराव चव्हाण यांचाही उल्लेख करावा लागेल. अंधश्रद्धा, प्रथा व परंपरेने समाजाला ग्रासले होते. महात्मा फुलेंनी म्हटल्याप्रमाणे "विद्येविना मती गेली.... सर्व अनर्थ एका अविद्येने केले" हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून सर्व समस्यांच्या निराकरणाचे मूळ हे शिक्षणात आहे. त्यामुळे दीन, दलित, अठरापगड जातीत विभागलेल्या समाजाला शिक्षणाचेद्वारे खुले करण्यासाठी बळवंतराव चव्हाण (वसंतराव चव्हाण यांचे वडील) यांनी नायगाव एज्युकेशन सोसायटीची १९५९ रोजी स्थापना केली. या शिक्षण संस्थेमध्ये ग्रामीण भागातील हजारो तरूणांनी शिक्षण घेऊन देशाच्या विविध भागात महत्वपूर्ण पदावर विराजमान झाले आहेत. स्वत: बळवंतराव चव्हाण हे १९७६ रोजी विधानपरिषद सदस्य पुढे ते १९८० आणि १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत बिलोली मतदार संघातून निवडूण आले होते. घरातूनच राजकारणाचे बाळकडू मिळालेल्या कुटुंबात वसंतराव चव्हाण यांचा जन्म १५ ऑगस्ट १९५४ रोजी नायगांव येथे झाला.

ऐसी कळवळ्याची याती!

करी लाभाविण प्रीती !!

वरील म्हणी प्रमाणे त्यांच्यावर कै. बळवंतराव अमृतराव चव्हाण यांचे संस्कार त्यांच्यावरसुद्धा झाले होते.

वसंतराव चव्हाण यांचे १० पर्यंतचे शिक्षण जनता हायस्कूल नायगांव येथे १९७१ च्या दरम्यान झाले. पुढील शिक्षण त्यांनी पीपल्स कॉलेज, नांदेड येथे घेत असताना घरची जबाबदारी सांभाळण्यासाठी बी.कॉम द्वितीय वर्षात असतानाच शिक्षण सोडून दिले. ते मूळ गावी नायगांव येथे गेल्यानंतर कृषी सेवा केंद्र चालवित असताना काँग्रेस पक्षाचे कार्य करण्यास सुरूवात केली. पुढे १९७६ दरम्यान ते बिलोली तालुका काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. तालुक्याच्या अध्यक्षपदाचे कार्य करत असतानाच ते १९७८ मध्ये नायगांव ग्रामपंचायतीचे सरपंच झाल्यानंतर त्यांनी २५ वर्षे ग्रामपंचायत ताब्यात ठेवली. १९९२ मध्ये ते नायगांव जिल्हा परिषद सर्कल मधून निवडूण आले.

संत तुकाराम महाराज यांनी म्हटल्याप्रमाणे-

धन्य ते माता-पिता!

पुत्र दिला जनसेवे करिता!!

वरील संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाप्रमाणे वसंतराव चव्हाण यांनी वडील बळवंत चव्हाण यांच्या सर्वच गुणांचे अनुकरण केले होते. वडिलांच्या पावलावर पाऊन ठेऊन वसंतराव चव्हाण यांनी नायगाव परिसरातील दिन, दलित, गरीब, कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी यांचे ते मायबापच म्हणून ओळखले जातात. त्यांनी वडीलाची जनसेवा करण्याची कावड स्वत:च्या खांद्यावर घेऊन कार्य करण्यास सुरूवात केली.

त्यांचा तालुक्यात वाढता प्रभाव लक्षात घेऊन २००२ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विधान परिषेदवर पाठविले. विधान परिषदेवर संधी मिळाल्यानंतर वसंतराव चव्हाण यांनी शैक्षणिक कार्याबरोबर सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून दिले होते. वडिलांच्याच

पावलावर पावूल ठेऊन नायगांव तालुक्यात स्वत:चे प्रभाव क्षेत्र निर्माण केले होते. त्यांनी विधान परिषदेऐवजी विधानसभेची निवडणूक लढविण्याची तयारी केली असता. त्यांना पक्षातंर्गत बंडाळीला सामोरे जावे लागले. म्हणून त्यांनी २००९ रोजी नायगांव मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अपक्ष म्हणून लढविली. कोणत्याही राजकीय पक्षाचे तिकिट न घेता सामाजिक कार्याच्या शिदोरीवरच त्यांनी ६३,५३४ मते घेऊन अपक्ष निवडूण आले. पहिल्याच निवडणुकीत त्यांनी प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बापूसाहेब गोरठेकर यांचा ११,१२० मतांनी पराभव केला. २०१४ साली वसंतराव चव्हाण यांनी काँग्रेस पक्षाकडून विधानसभेची निवडणूक लढवून त्यांनी एकूण मताच्या ७१,०२० मते घेऊन प्रतिस्पर्धी भारतीय जनता पार्टीचे राजेश पवार यांचा १०,४२५ मतांनी पराभव केला. २०१९ रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीत नायगांव मतदारसंघातून तिसऱ्यांदा वसंतराव चव्हाण उभे टाकले होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे राजेश पवार यांनी त्यांचा पराभव केला.

समस्यासूत्रण

संशोधनकार्यात संशोधन समस्येला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. संशोधनाचे क्षेत्र कोणतेही असो यामध्ये कृषी, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगोलिक, अवकाश, भूगर्भ, ऐतिहासिक इत्यादीमध्ये संशोधन समस्या केंद्रस्थानी असते. संशोधन समस्या निश्चित केल्याशिवाय संशोधनकार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यामध्ये संशोधन समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वप्रथम संशोधन समस्या निवडणे आवश्यक असते. वसंतराव चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेत विविध पदावर कार्य करीत असताना २००२ ते ०८ पर्यंत विधान परिषद आणि २००९ ते २०१४ या विधानसभा निवडणुकीमध्ये नायगांव मतदार संघातून विजयी झाल्यानंतर विधानसभेमध्ये संसदीय आयुधांच्या

माध्यमातून महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. वसंतराव चव्हाण यांनी विधिमंडळामध्ये नायगांव मतदारसंघाचे नेतृत्व करताना ठराव, लक्षवेधी सूचना, प्रस्ताव, तारांकित व अतारांकित प्रश्न, राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा, अल्पकालीन चर्चा संसदीय आयुधांच्या माध्यमातून समाजोपयोगी प्रश्नांची सोडवणूक करण्याचे कार्य केले आहे. या त्यांच्या ऐतिहासिक कार्याचा येणाऱ्या पिढ्यांना माहिती होण्यासाठी **"वसंतराव चव्हाण यांचे जीवन व कार्य एक चिकित्सक अभ्यास"** हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

संशोधन विषय निवडीचे महत्त्व

स्वातंत्र्योत्तर काळात नायगांव तालुक्यावर चव्हाण घराण्याचे वर्चस्व राहिले आहे. वडील बळवंतराव चव्हाण यांच्या नंतर वसंतराव चव्हाण यांनी नायगांव तालुक्यांचे नेतृत्व केले आहे. त्यामुळे नायगांव तालुक्याच्या ग्रामीण भागात शासनाच्या सोयी-सुविधा पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या घराण्याने केले आहे. आज नायगांव तालुक्याचा जो काही विकास झालेला आहे यामध्ये चव्हाण घराण्याचे खूप मोठे योगदान राहिले आहे. वसंतराव चव्हाण यांनी नायगांव तालुक्याचे विधिमंडळामध्ये २००२ ते २०१९ पर्यंत प्रतिनिधत्व करताना महत्वपूर्ण प्रश्न सभाग्रहामध्ये उपस्थित केले होते. त्या प्रश्नांचा सरकारच्या ध्येय धोरणावर काय परिणाम झाला? सभाग्रहाने त्यांच्या प्रश्नांची दखल घेऊन सोडवणूक केली आहे का? एकूणच विधिमंडळीय कार्याचा आढावा घेणे चिकित्सक दृष्टिकोनातून महत्वाचे आहे. कारण ऐतिहासिक कार्याचा फायदा येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरत असतो.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधनाची काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढीलप्रमाणे-

१. वसंतराव चव्हाण यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. वसंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीमध्ये महत्वपूर्ण ठरलेल्या घटकांचा आढावा घेणे.

३. वसंतराव चव्हाण यांच्या विधिमंडळीय कामकाजातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय मुद्यांचा अभ्यास करणे.

४. वसंतराव चव्हाण यांचे कृषी, पाटबंधारे आणि अनैतिक कार्याच्या संदर्भातील विधिमंडळीय भूमिकांचा अभ्यास करणे.

५. वसंतराव चव्हाण यांनी घेतलेल्या भूमिकेचा शासनाच्या ध्येय धोरणावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

संशोधन विषयाची गृहीतके

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी निश्चित केलेले गृहीतके पुढीलप्रमाणे मांडली आहेत.

१. वसंतराव चव्हाण हे संयुक्त कुटुंब पद्धतीतील अनुयायी असून त्यांच्या कुटुंबात चार ते पाच पिढ्यांचे लोक एकत्र राहतात.

२. वसंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीमध्ये महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रभावी ठरले आहेत. याबरोबरच वडील बळवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण यांच्याही विचाराचा प्रभाव पडला आहे.

३. वसंतराव चव्हाण यांनी विधिमंडळामध्ये सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय इत्यादी महत्वपूर्ण प्रश्न उपस्थित केले आहेत.

४. वसंतराव चव्हाण यांनी विधिमंडळामध्ये कृषी, पाटबंधारे आणि कायदा व सुव्यस्था कार्या संदर्भात वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले आहेत.

५. वसंतराव चव्हाण यांनी समाजोपयोगी घेतलेल्या भूमिकेमुळे शासनाला त्यांच्या ध्येय धोरणास अनेक वेळेला मुरड घालावी लागली आहे.

संशोधन पद्धती

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत संशोधन असे तीन प्रकार पडतात. व्यावहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहारांशी संबंधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्परांशी पूरक असून क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्भवलेल्या समस्यांचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या जात नाहीत. या संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थळकाळपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधन मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे तुलनात्मक, ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. त्याबरोबरच आवश्यक त्या ठिकाणी स्तंभालेख, वर्तुळ या सांख्यिकीय अभ्यास पद्धतीचासुद्धा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती किंवा मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित व्याप्ती आणि मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे

अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. संशोधनाला मर्यादा नसेल तर संशोधन कार्य मूळ उद्देशापासून भरकटत असते. प्रस्तुत संशोधनात “वसंतराव चव्हाण यांचे जीवन व कार्य एक चिकित्सक अभ्यास” या विषयाच्या अनुषंगाने विधिमंडळीय कार्याचा अभ्यास करण्याचा मुख्य हेतू आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने काही संदर्भ येऊ शकतात ही या संशोधनाची मर्यादा आहे.

तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधन विषय मूलभूत संशोधनात येत असल्यामुळे संशोधन कार्यासाठी माहितीची जमवाजमव करण्यासाठी प्राथमिक व **द्वि**तीय स्त्रोताचा उपयोग केला आहे. प्राथमिक स्त्रोतामध्ये मूलाखत, प्रश्नावली, अनुसूची तसेच त्यांनी लिहिलेले साहित्य यांचा उपयोग केला जाईल. तर **द्वि**तीय स्त्रोतामध्ये विधानसभा निवडणूक निवडणुकीचे अहवाल, विधिमंडळीय कामकाजातील स्थगन प्रस्ताव, तारांकित व अतारांकित प्रश्न, ठराव, लक्षवेधी, प्रस्ताव, अल्पकालीन चर्चा तसेच शासकीय अहवाल, प्रकाशने, खाजगी संस्थाचे प्रकाशने, वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादींचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाचा आराखडा

संशोधनाला व्यवस्थित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधन विषयाची विभागणी विविध प्रकरणांत पुढीलप्रमाणे केली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : नेतृत्वाची संकल्पना व स्वरूप

प्रकरण तिसरे : वसंतराव चव्हाण यांची जडणघडण

प्रकरण चौथे : संसदीय कामकाजाचे आयुधे

प्रकरण पाचवे : वसंतराव चव्हाण यांच्या विधिमंडळीय कामकाजाचा चिकित्सक आढावा

प्रकरण सहावे : सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ

१. ठोसर हरिहर, प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्त्व, मराठवाडा : काल आणि आज, संपादक, भगवान काळे, संकेत प्रकाशन, जालना, १९८६

२. गर्गे, स.मा., भारतीय समाज विज्ञान कोष, समाज विज्ञान मंडळ, प्रकाशन, पुणे, १९८९

३. शिक्षणाचे अधिष्ठान तात्विक, सामाजिक व सांस्कृतिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रकाशन, १९९१

४. अभ्यंयकर, नेतृत्वाचे पैलू, स्नेह वर्धन पब्लिकेशन, पुणे, १९९६

५. मराठी विश्वकोष, खंड ८ वा, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, पुणे

६. परिवर्तनाचा वाटसरू, संपादक मंडळ, अभय कांता, तुकाराम जाधव, विजय कुंजीर, प्रकाशक, नर्मदा आफसेट, पुणे

७. तुकाराम जाधव-संपादक, महाराष्ट्र वार्षिकी २०१५, प्रकाशन, युनिक ॲकॅडमी पुणे,

८. महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे संकेत स्थळ

९. सी.एस.डी.एस.ची आकडेवारी सुहाय पळसीकर, द इंडियन एक्सप्रेस आणि चाणक्यची आकडेवारी

१०. आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती २०००

११. भारतीय संस्कृतीचा एनसायक्लोपीडिया - एड. पं. महादेवशास्त्री जोशी, अनमोल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३

१२. बोधनकर व अलोणी (२००७), सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन, नागपूर

१३. पाटील, बा.भा., संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २००६, पुणे
१४. Gisbert P., Fundamentals of Sociology, Orient Blackswan Pvt. Ltd, Hyderabad, 2011
१५. Darshankar A.Y., 1-Leadership in Panchayati Raj, Panchsheel Parkashan.
१६. Jayapalan N., Rural Sociology, Atlantic Publishers and Distributors, New Delhi, 2002
१७. John H. Kessel George F., Last.G.Lelingman The Study of Politixal Leadership micropolitics Ed. By. Cole Robert G.Seding Published by Holt Rinahart & Winstornn The New York 1570
१८. Strategies and Spoils A Social Anthropology of Politics By P.G. Bailey Basil Balckwell Publisher Ltd. Oxford U.K. 1869
१९. Gabrial Almond politics of Developing areas 1960
२०. An Anotormy of leadership-Heroes and superman by Eugene E Jennining M.C. Graw Hill Book Co.New Delhi 1972
२१. Lord Loyd of Dolonrah Leadership in Democracy oxford University Press 1939.
२२. Harod D. Laswel Power and Personality New York Narton 1948
२३. Encyclopedi Britanica 1967
२४. International Encyclopedia of Social Sciences
२५. B.N. Pandey. Leadership in South Asia Edited by, Publishing House, New Delhi, 1977
२६. www.wikipedia.org

२७. http://mls.org.in

२८. http://maharashtra.gov.in

२९. http://nanded.gov.in

३०. http://zpnanded.in

३१. Newspaper, weekly etc.

३२. http://eci.gov.in

संशोधक

साईनाथ मनोहर गायकवाड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. संगीता संदीप शिंदे
प्रोफेसर, इतिहास विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड
ता.नांदेड जि.नांदेड